

Indigenous Knowledge for Conservation

Languages I Arts I Culture I Water I Environment I Soil I Values

## परिषद

# ‘अ’पूर्वसंचित

### वारसा भाषापरंपरांचा ... शोध शाश्वत समृद्धीचा

### २१ आणि २२ फेब्रुवारी २०१९

Organized By MITE EDUCATIONAL FOUNDATION

Hosted By College of Agriculture DBSKKV, Dapoli

स्थानिक भाषा, परंपरा आणि कला यांच्या माध्यमातून ज्ञानाचा खूप मोठा खजिना दडलेला आहे. या खजिन्याचा उपयोग आपले पूर्वज, स्थानिक यांनी पर्यावरण, शेती, पाणी, माती, आरोग्य,कला आणि मुल्य यांच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी कळत नकळतपणे जागता ठेवला आहे. जगभरातच हा खजिना विविध कारणांमुळे नष्ट होत चालला आहे.

२०१९ हे वर्ष **International Year OF Indigenous Languagases** म्हणून साजरे होते आहे. याचनिमित्ताने स्थानिक भाषा, परंपरा आणि ज्ञान यांच्या माध्यमातून भाषा, पर्यावरण, शेती, जल, माती, आरोग्य, कला आणि मुल्ये यांचे संवर्धन कसे होईल याचा विचार करून एक कृती आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्यात येत आहे. याकरिता २०१९ या वर्षात चार परिषदा घेण्याचे नियोजन केले आहे. यातील पहिली परिषद ही विषयाचा आवाका जाणून घेणारी असणार आहे. त्याचसोबत स्थानिक भाषा आणि त्यातील माहितीचे शास्त्रशुद्ध संकलन याची आवश्यकता अधोरेखीत करणे हा देखील या परिषदेचा हेतू आहे.

या परिषदेत तज्ज्ञांच्या मदतीने पारंपारीक बियाणे आणि प्रजाती संवर्धन, जलव्यवस्थापन पद्धती, जैवविविधता व्यवस्थापन, बोलीभाषांचे संवर्धन, आदिवासी चित्रकला आणि शिल्पकला या विषयांचा आवाका आणि आवश्यकता जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्याचसोबत या लुप्त होत चाललेल्या माहितीच्या खजिन्याचे संवर्धन आणि त्याची आधुनिक जीवनशैलीशी सांगड घालून शाश्वत समृद्धीच्या दिशेने कसा प्रवास करता येईल यावर ऊहापोह करण्यात येईल. या वारशाला असलेल्या धोक्यांचा आढावा घेऊन त्यावर करता येणाऱ्या उपाययोजनांवरही चर्चा होईल. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे यासगळ्या घटकांचा विचार करून सर्वंकश कृती आराखडयाच्या दिशेने वाटचाल सुरू करणे हा या परिषदेचा सर्वात महत्त्वाचा उद्देश असेल.

| जगामध्ये | भारतामध्ये |
|---|---|
| एकूण भाषा ७००० | एकूण भाषा ४३५ |
| स्थानिक जमाती ५००० | नष्ट झालेल्या भाषा १४ |
| धोक्यात असलेल्या भाषा २६८० | धोक्यात असलेल्या भाषा ६९ |

या भाषांपैकी बहुतेक भाषा या बोलीभाषा असून त्यातील ज्ञान हे अत्यंत कमी प्रमाणात लिखीत स्वरुपात आहे. त्यामुळे भाषा नष्ट होण्यासोबत हे ज्ञानही नष्ट होणार आहे.

परिषद तारीख : २१-२२ फेब्रुवारी २०१९
परिषदेचे स्थळ : कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर, डॉ.बा.सा.को.कृ.वि., दापोली
वेळ : स. ९.०० ते सायं. ६.००

## अधिक माहितीसाठी संपर्क

भ्रमणध्वनी : वैजयंती ठकार ९६६५८८०९४६
सारंग ओक ७२१९२५९१४९
ईमेल : miteefoundation@gmail.com

नोंदणी फी : रू. २००/-
विद्यार्थ्यांसाठी : रू. १००/-

Registration Link : https://docs.google.com/forms/d/1HPRtDV-xi9lipPab6RJNOPwWwnOBq2Sb6LPM26ylvtc/edit?usp=drivesdk

# परिषदेतील वक्ते आणि विषय



## डॉ. वरद गिरी

स्थानिक प्रजाती, त्यांचे पर्यावरणातील स्थान व त्याना असेलेले धोके



## निलीमा जोरवार

शेती, स्थानिक बियाणे – उपयोग, उपायोजन आणि उपजिविका.



## डॉ. उमेश मुंडल्ये

देवराई – जलव्यवस्थापन आणि जैवविविधता व्यवस्थापन



## डॉ. डि. के. कुलकर्णी

पारंपारिक शेती – फायदे, तोटे आणि आधुनिकतेची जोड



## डॉ.स्वप्नजा मोहिते

पाण्याजवळ राहाणारे समाज, त्यांच्या पारंपारिक पद्धती, भाषा, त्यातून होणारे जैवविविधता संवर्धन



## डॉ. सचीन जोशी

आदिवासी शिल्पे



## श्रीनिवास आगवणे

आदिवासी चित्रकला– पर्यावरणीय माहितीचा स्त्रोत



## डॉ.राहूल मुंगीकर

माहिती संकलन – शास्त्रीय पद्धती, कायदे आणि संरक्षण

### विशेष चर्चासत्र

● बोलीभाषा – पारंपारिक पर्यावरणीय माहितीचा खजिना ●

● भाषासंवर्धन – ज्ञानसंवर्धन – माहिती संकलनाची गरज आणि कृती आराखडा●



## सहआयोजक

Indigenous Knowledge for Conservation
Languages I Arts I Culture I Water I Environment I Soil I Values

समग्र नदी परिवार
शेतकऱ्यांची समृद्धी
पाण्याच्या थेंबा थेंबातून

वनराई

Maharashtra Vruksha Samvardhini
Estd-1989
महाराष्ट्र वृक्ष संवर्धिनी
वृक्षो रक्षति रक्षितः

BHAASHAA
The Centre for Preservation and
Enhancement of Regional Languages

Foundation for Biodiversity Conservation
FBC
Working at grassroots

# ‘अ’पूर्वसंचित

**वारसा भाषापरंपरांचा ... शोध शाश्वत समृद्धीचा**